MHWS08000011-2017

## नियमित दिवाणी दावा क्र.२/२०१७ दिपक ..वि.. मारोती व इतर मधील निशाणी क्र.३९ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींतर्फे अतिरीक्त मुद्दे काढण्यासाठी दिलेला आहे. वादीने त्याचे म्हणणे अर्जाच्यामागील बाजूस दिलेले आहे. अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला.

२. अर्ज, म्हणणे व युक्तिवाद यावरुन खालील मुद्दे/वादप्रश्न निर्णयाकरिता उपस्थित झालेले आहेत. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रस्तुत अर्जातील विनंतीनुसार अतिरीक्त मुद्दे काढणे आवश्यक आहेत काय ? | होकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**वादप्रश्न क्र.१ करिता –**

३. दोन्ही बाजुच्या वतीने त्यांचे कथन व म्हणण्यानुसार युक्तीवाद करण्यात आला आहे. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द उद्घोषणा व ताबा मिळणेकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार ''सदर दाव्यात योग्य त्या पक्षकारांना पार्टी म्हणून समाविष्ठ केले आहे काय ?'' व ''सदर दाव्यात योग्य त्या पक्षकारांना समाविष्ठ न केल्यामुळे दावा चालण्यास पात्र आहे काय?'' हे मुद्दे काढण्याकरिता विनंती केली आहे. सदर अर्जास वादी तर्फे विरोध करण्यात आला आहे. प्रतिवादी यांनी दाखल केलेली लेखी कैफियत पाहता, प्रतिवादीने अतिरीक्त मुद्देच्या अनुषंगाने कथन केले आहेत. मात्र नि.क्र.१३ वर सदर मुद्दे काढल्याचे दिसून येत नाहीत.

सदर दुरुस्तीनुसार प्रतिवादी यांनी अर्जात विनंती केल्यानुसार वादाचे मुद्दे निश्चित करणे आवश्यक आहे. त्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट दावा गुणदोषावर चालून निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ च्या निष्कर्षार्थ मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. नि.क्र.३९ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. खालील अतिरिक्त मुद्दे काढण्यात येत आहे.

अ) ''सदर दाव्यात योग्य त्या पक्षकारांना पार्टी म्हणून समाविष्ठ केले आहे काय'' ?

ब) ''सदर दाव्यात योग्य त्या पक्षकारांना समाविष्ठ न केल्यामुळे दावा चालण्यास पात्र आहे काय'' ?

DINESH MUKUND GAIKWAD

Digitally signed by DINESH MUKUND GAIKWAD
Date: 2025.12.24 15:20:05 +0530

( दिनेश मु. गायकवाड )

दि.२०/१२/२०२५ सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, रिसोड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | B. V. Bhisade |
| Name of court | : | Jt.C.J.J.D.& JMFC, Risod. |
| Date | : | 20.12.2025 |
| Order signed by the Presiding Officer | : | 22.12.2025 |
| Order uploaded on | : | 24.12.2025 |